# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

आपल्या मनातील भावना, विचार, मते मुद्देसूदपणे, सुसंबद्ध पद्धतीने अपेक्षित व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे पत्रलेखन होय.

पत्रलेखन
- औपचारिक (व्यावहारिक)
- अनौपचारिक (घरगुती, कौटुंबिक)

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये अनौपचारिक व औपचारिक पत्रलेखनाचे काही प्रकार तुम्ही अभ्यासले आहेत.

स्वपरिचय, मागणी व तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा यावर्षी आपण अभ्यास करणार आहोत.

**औपचारिक पत्रप्रारूपाचे प्रमुख घटक**
- मायना व विषय
- ज्यांना पत्र पाठवायचे त्यांचा पत्ता (लिफाफ्यासह)
- पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता व दिनांक
- विषयानुरूप मांडणी
- मुख्य मजकूर
- समारोप

✻ कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असेल, ती कृती, विषय समजून घेऊन तुम्हांला पत्रलेखन करायचे आहे.

**पत्रलेखनाचे स्वरूप**
- पत्रलेखनाचा विषय (निवेदन), सूचना, जाहिरात, बातमी इत्यादींपैकी एक.
- कृतीच्या आकलनावरून पत्रलेखन.
- पत्रलेखनाच्या संपूर्ण प्रारूपाचा समावेश आवश्यक.
- कृतीतील सर्व मुद्दे लेखनात येणे आवश्यक.
- पत्राच्या विषयानुरूप प्रभावी भाषाशैली.

**औपचारिक पत्राची मांडणी**

१. पत्राच्या सुरुवातीला उजव्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचे नाव, हुद्दा, पिनकोडसह पत्ता, दिनांक, ई-पत्ताही असावा.

२. डावीकडे योग्य मायना लिहावा. संबंधित व्यक्तीचे नाव, हुद्दा, पत्ता लिहावा.

३. कृतीत विशेषनाम दिले असेल तरच ते लिहावे. अन्यथा प्रति, प्रेषक याठिकाणी 'अ. ब. क.' असा उल्लेख करावा.

४. औपचारिक पत्रात पत्राचा 'विषय' लिहिणे आवश्यक आहे.

५. विषयानंतर त्या खाली महोदय/महोदया असे लिहून पत्रलेखनास सुरुवात करावी.

६. विषयानुसार लेखन व भाषा असावी.

७. शेवटी योग्य ते संबोधन वापरून समारोप करावा.

**लक्षात घ्या, औपचारिक पत्रलेखन ही एक कला आहे, तसेच ते शास्त्रही आहे.**

**नमुना १**

- **खालील निवेदन वाचा–**

संबंधित विषयासाठी स्व–परिचय पत्र तयार करा.

अभिनव विद्यालय, लातूर.

आंतरशालेय क्रीडास्पर्धा

क्रीडास्पर्धेतील कबड्डी संघात प्रवेश मिळणेबाबत

स्पर्धा
दि.२६, २७,
२८ डिसेंबर

क्रीडा विभाग प्रमुख

**स्वपरिचय पत्राचे मुद्दे**

| | |
|---|---|
| (१) संपूर्ण नाव | (५) उंची– वजन– |
| (२) पत्ता | (६) शैक्षणिक पात्रता |
| (३) संपर्क क्रमांक | (७) इतर आवडणारे खेळ |
| (४) जन्मतारीख | (८) पूर्वी प्राप्त केलेले यश |

**नमुना २**

**रसिक कला मंडळ**

समर्थनगर, पुणे

आकाशकंदील आणि पणत्या
तयार करण्याची कार्यशाळा

दि.४ व
५ नोव्हेंबर
सायं–४ ते ७

प्रवेश नि:शुल्क

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

वस्तू खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध

**स्थळ**
रानडे सभागृह,
समर्थनगर, पुणे

कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तू खरेदीची मागणी करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.

किंवा

तुम्ही खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये काही वस्तू सदोष आढळल्या, याविषयी तक्रार करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.


**विद्यार्थ्यांसाठी :**

स्वपरिचय पत्र हा कृतिपत्रिकेतील लेखन विभागात (मूल्यमापनात) समाविष्ट नाही. मात्र, विद्यार्थ्यांसाठी हा प्रकार/घटक उपयुक्त असल्याने, त्याचा अभ्यास करावा.

# २. बोलीभाषांचा परिचय

'दर बारा कोसांवर भाषा बदलते', या उक्तीनुसार वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या बोलींचा कमी-अधिक प्रभाव असतो.

'एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय: मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे ध्वनिरूप साधन म्हणजे बोली.' प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ ना. गो. कालेलकर यांनी केलेली बोलीभाषेची ही व्याख्या.




**आधुनिक काळात बोलीभाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वागतशील.**

* पाठ्यपुस्तकात आपण प्रातिनिधिक स्वरूपात पावरी व कातकरी या बोलीभाषांचा परिचय व्हावा म्हणून त्यातील गद्यउतारे व त्यांचे प्रमाणभाषेतील रूपांतरे समाविष्ट केली आहेत. विद्यार्थ्यांनी या बोलीभाषेतील उताऱ्यांच्या अभ्यासाबरोबर आपल्या परिसरातील बोलीभाषांचा अभ्यास करावा, त्यांतून भाषिक समृद्धी व साहित्याचा परिचय असा दुहेरी आनंद मिळवावा.

# १. पावरी बोली

हांजपल्ली टाईम. आश्रम शालान् पटांगणम् पुऱ्या खेलता ओता. राजेश नावान् पुर्यो एखलूज् झेंडान् खांबह् लागीन बठलू ओतो. तेरी आई हाते खतायलू ओतू. तेरू बाबू, आप्पू दिहूँ आश्रम शालाम मेकीन आवलू ओतू. पाचवीन् वर्गाम् तेरं नाव आपलं ओतं. तिन्हा आवनू नि ओतो शू आयहि विचार करीन कयतू ओतू, ''आई, बाबाहो नाहा करीन कय... तोहों सोडीन मेहे शिकनेहे नि जाणू चेतहो.'' आई मुंडोपर, डिलोपर आथ फिरविन कयली, ''बेटा, तोंहो खुप मोटू अयनू चेतहं. तु खुप मोटु सायेब व्हवनू जूवे यं आयहीन् हिवणं चेतहं... बेटा. आईन् हिवणं पुरं नि कन्यूके? हवं के... अन्तू खुप शिकनू पंडहे. तिन्हानं करता थोडा दिहं आई दखू सेटू सेहे? नि बेटा, मी कायम तोहं हातेज सेहे. आईन्-बेटान् इन्द्र नात्र गारा-पानीअहाल रयतलं. इनू दुय्यहं केदिहि अलग अयतलं देखलं के? नि ने..... राजेश अगल कयत्लू, ''आई मे हे रूटू कुण कुहनिन् खावाड हे? मेहे हुवणीखेर कुण थापडीन हुवाडहे? मारं वगे कुण रयहे? मेहे पेटोहाते कुण लागाड हे'' खुप विचार करीन पुसतु. आई आहती कयलं, ''पुऱ्या शिकीन खूप मोटू अयणेन् करता तोहज् मोटू अयणू पडहे. आईन् आंगल सुडीन रयणू पडहे. सोतान् पायपर उबं रयणू पडहे...'' ''पुण आई मी एखलू केहेकं रयहि?'' राजेश कयत्लू. ''तू एखलू काहरी शेऽ बेटा? देड-दुर्दहव तारा भाई तोहं हाते अहते...उठते...जा खेलणेह...'' राजेश हाते वर्गामार्दन संतोषह खेलणेहे हाततू ओतू. राजेशह तेरी चुक मोन्दु पौडी अती. डुला नुसला... ने उठतु उठतु पुऱ्या हाते खेलणेहे गायब अय गयलू.

**रूपांतर**

संध्याकाळची वेळ. आश्रम शाळेच्या पटांगणात मुले खेळत होती. राजेश मात्र झेंड्याच्या खांबाला टेकून एकटाच बसला होता. तो आपल्या आईवर रागावला होता. त्याचे वडील, आप्पांनी आज दुपारीच त्याला आश्रमशाळेत पोहोचवलं. पाचवीच्या वर्गात त्याचं नाव घातलं. त्याला यायचं नव्हतं. तो आईला विनवून म्हणाला, ''आई... आप्पाला नको म्हणून सांग ना... तुला सोडून मला नाही जायचं शिकायला...'' आई त्याच्या पाठीवरून, डोळ्यावरून मायेने हात फिरवत म्हणाली, ''बाळ, तुला खूप मोठ्ठं व्हायचं आहे. तू खूप मोठ्ठा साहेब व्हावा, हे आईचं स्वप्न आहे... बाळ, आईचं स्वप्न पूर्ण नाही करणार? हो ना.. मग त्यासाठी खूप शिकावं लागेल. त्यासाठी आईपासून थोडे दिवस दूर जावं लागेल. तुला काय वाटतं? मी तुझ्यापासून दूर आहे? नाही बाळ, मी सदैव तुझ्याजवळच आहे. माय-लेकरू यांचं नातं चिखल-पाण्यासारखं असतं. या दोघांना कधी वेगळं झालेलं पाहिलं आहे? नाही ना...'' राजेश पुढे म्हणाला, आई मला भाकर चुरून कोण खाऊ घालणार? मला झोपतांना कोण थोपटणार? माझी बाजू कोण घेणार? मला पोटाशी कोण धरणार?'' अनेक प्रश्न विचारले. आई हसत म्हणाली, ''बाळ, शिकून मोठं होण्यासाठी आताच तुला मोठं व्हावं लागेल. आईचं बोट सोडून जगावं लागेल, स्वावलंबी व्हावं लागेल...'' ''पण आई मी एकटा-कसा राहू?'' ''तू एकटा कुठे आहेस बाळ तुझे दीड-दोनशे भाऊ तुझ्या सोबत असतील... उठं बरं...जा खेळायला...'' राजेशच्या वर्गातला संतोष त्याला खेळायला बोलावत होता. राजेशला आपली चूक लक्षात आली. त्याने आपले डोळे पुसले आणि उड्या मारत खेळणाऱ्या मुलांमध्ये गायब झाला.

**– संजीव गिरासे.**

## २. कातकरी बोली

भुकणे मरूणा ये दिवस नाग्याना सहन करहताहात. पण त्यावर उपाय भेटता नाही. काम करूनी तयारी असून काम नाही. भुकने दिवस काढुला लागत. पहिला लढा नंतरने आर्थिक मंदिना ते पारतंत्र दिवस ब्रिटीसाहने सत्तेना, नाहि मार्गदर्शन, नाहि हितचिंतक ये परिस्थितीत कण्या देवधर्मनी कना उपास तपास, शाळेना तर नाव नाही. गावातल्यासाठी शाळा, गाववाल्यासाठी देवला आपण फक्त त्याहने साठी ढोराने सारखी काम करायचा भेटना ती खायचा, नायतन आर्धेच भुकवर निजी जायचाये पण दिवस जातील, चांगला दिवस येतील देवलातले मिटिंगीत आखलेले पुढाऱ्याही शब्द त्याला आठवतात. ''चाला उठा जागा हया!''

### रूपांतर


भुकेने मरणे हे दिवस नाग्याला सहन होत नव्हते; पण त्यावर उपाय सुचत नव्हता. काम करण्याची तयारी असून, काम नाही. भुकेले राहून दिवस काढावे लागत होते. पहिले युद्ध, नंतर आर्थिक मंदी त्यात पारतंत्र्याचे दिवस, ब्रिटिशांच्या सत्तेचे मार्गदर्शन नाही, कोणी हितचिंतक नाही. या परिस्थितीत कसले देवधर्म नी कसले उपासतापास. शाळेचे तर नावच नाही. गावातल्यांसाठी शाळा. गाववाल्यांसाठी मंदिर. आपण फक्त त्यांच्यासाठी जनावरासारखे काम करायचे, मिळेल ते खायचे, नाहीतर अर्धपोटी झोपी जायचे. हे पण दिवस जातील. चांगले दिवस येतील. देवळातील सभेमध्ये पुढाऱ्यांनी काढलेले शब्द त्याला आठवत होते. 'चला उठा, जागे व्हा!'

**- अनिल वाघमारे.**

**विद्यार्थ्यांसाठी :**

वरील दोन्ही बोलीभाषांतील उतारे त्या भाषांचा परिचय व्हावा, आपापल्या परिसरातील बोलीभाषांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून पाठ्यपुस्तकात समाविष्ट केले आहेत. कृतिपत्रिकेमध्ये बोलीभाषेवरील कृती किंवा रूपांतर विचारणे अपेक्षित नाही. मात्र, विद्यार्थ्यांना हा घटक उपयुक्त असल्याने त्याचा अभ्यास करावा.

# ३. कथालेखन



उपयोजित लेखनप्रकारांमध्ये 'कथालेखन' हा घटक विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखनाला वाव देणारा आहे. कल्पना, नवनिर्मिती, स्वभाषेत प्रकटीकरण हे या वयोगटाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत. कथालेखनाच्या योग्य सरावाने भावी कथालेखक घडू शकतील.

कथाविषयानुसार कथांचे विविध प्रकार पडतात.

उदा.,

(१) शौर्यकथा

(२) विज्ञान कथा

(३) बोधकथा


(४) जातक कथा

(५) ऐतिहासिक कथा

(६) रूपककथा

(७) विनोदी कथा इत्यादी.

कथालेखनाचे महत्त्वाचे घटक जाणून घेण्यासाठी खालील मुद्द्यांचा अभ्यास करून कथालेखन तंत्र जाणून घेऊया.




**खालील मुद्द्याचा सविस्तर विचार करूया.**

**(१) कथाबीज–**

कथालेखन ही कल्पकतेवर आधारलेली कला आहे. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथालेखन करताना कथाबीजाच्या विषयास अनुसरून दैनंदिन निरीक्षण, वाचन, अनुभव, सृजनशील कल्पना, भावना यांचा विचार करून कथाबीज फुलवावे.

**(२) कथेची रचना–**

कथेला प्रारंभ, मध्य व शेवट असावा. कथेची सुरुवात आकर्षक असावी. वाक्यांची रचना पाल्हाळीक नसावी. अर्थपूर्ण छोटी छोटी वाक्ये असावीत. कथेचा मजकूर उत्कंठावर्धक असावा. कथेतील आशयाला काहीतरी वळण असेल तर उत्कंठा अधिक वाढते. कथा नेहमी भूतकाळातच लिहावी.

**(३) कथेतील घटना व पात्रे–**

कथाबीजानुसार कथेतील पात्रे व घटना निवडाव्यात, त्या कथाबीजाला पुढे नेऊ शकतील. घटना घडण्याचे स्थळ सुसंगत निवडावे. पात्र, घटना व स्थळांच्या वैशिष्ट्यांचे बारकावे जाणून घेऊन वर्णन करावे. वर्णन चित्रदर्शी असावे.

**(४) पात्रांचे स्वभाव विशेष–**

कथेतील आशयाला समर्पक असे पात्रांच्या स्वभाव विशेषांचे व त्या अनुषंगिक वर्तनांचे वर्णन करावे. उदा., राग आला तर– त्याने हाताच्या मुठी करकचून आवळल्या इत्यादी.

**(५) कथेतील संवाद व भाषा–**

कथेत निवडलेल्या परिसराला कथाबीजाला अनुसरून कथेची भाषा असावी. आलंकारिक भाषेचा वापर करून कथेची परिणामकारकता वाढवता येते. विरामचिन्हांचा योग्य वापर करावा. संवादाची परिणामकारकता विरामचिन्हांमुळे निर्माण होते. पात्रांच्या तोंडी पात्राच्या वैशिष्ट्यांच्या गरजेनुसार ग्रामीण भाषा व बोलीभाषा यांचा वापर सहजतेने करायला हवा. कथेमध्ये वाक्प्रचार, म्हणी यांचा सुयोग्य वापर करावा.

**(६) शीर्षक, तात्पर्य–**

संपूर्ण कथेचा आशय, कथेतील मूल्य/संदेश व्यक्त करणारे शीर्षक असावे. कथेतून मिळणारा संदेश/मूल्य किंवा कथेतील वैशिष्ट्यपूर्ण आशय प्रतिबिंबित करणारे तात्पर्य असावे.

**कथालेखन पूर्णत: सृजनशील कल्पकतेवर अपेक्षित आहे. कथाबीज विस्तारासाठी, अपूर्ण कथा पूर्ण करण्यासाठी वेगळा नावीन्यपूर्ण विचार किंवा कल्पना करणे अपेक्षित आहे.**

**विद्यार्थ्यांनो, तुमच्या सृजनशील कल्पनेला खूप धुमारे फुटू शकतात. त्यांना फक्त निरीक्षण व कल्पकतेने अभिव्यक्त करा.**

## कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती

(१) कथाबीजावरून (दिलेल्या विषयांवरून) कथालेखन.

(२) मुद्द्यांवरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे किंवा उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) दिलेल्या शीर्षकावरून कथालेखन.

कथालेखनासाठी वरीलपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्‌धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.


## कथालेखन नमुना

- खालील अपूर्ण कथा वाचा. तुमच्या विचार व कल्पनेने कथा पूर्ण करा.

प्रकाश आणि अन्वर जीवश्चकंठश्च मित्र. एकाच वर्गात, एकाच बाकावर बसणारे, एकत्र डबा खाणारे सच्चे सोबती. दिवाळीची सुट्‌टी लागली आणि अन्वर आईबरोबर गावाला गेला. आता सुट्‌टी संपेपर्यंत हे मित्र भेटणार नव्हते. दिवाळीची सुट्‌टी संपायला दोन दिवस होते. प्रकाशला अन्वरच्या भेटीची ओढ लागली होती. सुट्‌टीतला अभ्यास पूर्ण करण्यासाठी प्रकाशने दप्तर काढले. पुस्तकात त्याला अन्वरने लिहिलेली चिठ्‌ठी मिळाली. त्याने उत्सुकतेने चिठ्‌ठी वाचायला घेतली आणि.....

- तुम्ही लिहिलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या.
- कथा तयार करताना व लिहिताना तुम्ही कोणकोणत्या गोष्टी विचारात घेतल्या? ते लिहा.





# ४. जाहिरात

'जाहिरात' या शब्दातच तिचा अर्थ सामावलेला आहे. इंग्रजीत 'जाहिरात'साठी Advertisement हा शब्द आहे. यातील 'Ad' चा अर्थ 'कडे' आणि 'verfo' चा अर्थ 'वळणे' किंवा 'लक्ष वेधून घेणे' असा आहे. म्हणूनच लोकांचे लक्ष एखाद्या गोष्टीकडे वेधून घेते ती जाहिरात होय. यादृष्टीने विविध क्षेत्रांतील निर्मित वस्तू, उत्पादने यांची ग्राहकाकडून मागणी निर्माण करणारी जाहिरात ही एक कला आहे.

आजच्या संगणक व माहिती-तंत्रज्ञानाच्या युगातील इंटरनेट व मोबाईल क्रांतीमुळे जाहिरातक्षेत्राची कक्षा अधिक विस्तारत चालली आहे.

कला, क्रीडा, शिक्षण, आरोग्य, व्यापार, दळणवळण, प्रसारमाध्यम, मनोरंजन अशा सर्वच क्षेत्रात जाहिरातीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, म्हणूनच 'युग' आहे जाहिरातींचे...' असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## • जाहिरातक्षेत्रातील भाषेचा वापर

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

## • जाहिरातीची भाषा-

(१) आकर्षक मजकूर.

(२) साधी, सोपी, सरळ, आकर्षक, स्पष्ट व ओघवती भाषा.

(३) बुद्धीला फारसा ताण न देणारी.

(४) ग्राहकाच्या मनात विश्वासार्हता निर्माण करणारी.

(५) शब्दांचा गैरवापर न केलेली.

(६) लोकभावनांची जोड, जाण असणारी.

(७) वेचक, अर्थपूर्ण, प्रसन्न व परिणामकारक.


(८) लयबद्ध व वाचकांशी सुसंवाद साधणारी.


(९) विनोदाची झालरही असणारी.

(१०) मानवी भावभावनांची संवेदनशीलता जाणणारी व जपणारी.


उदाहरणादाखल जाहिरातीचे काही नमुने आपण पाहिले, तर त्यातून जाहिरातकलेची विविध रूपे आपल्या लक्षात येऊ शकतात.


आजचे युग जाहिरातीचे युग





लोकांच्या मनात एखाद्या वस्तूविषयी आवड निर्माण करणे हा जाहिरातीचा हेतू.




**जाहिरातलेखनाच्या मूल्यमापनाच्या कृती.**


- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन.
- दिलेल्या मुद्द्यांवर जाहिरात लेखन.

या व्यतिरिक्त वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.


## जाहिरात लेखन नमुना

नमुना क्र.१


- खालील जाहिरात वाचून त्याखालील कृती करा.




(अ) कृती करा.




(आ) शब्दजाल पूर्ण करा.




(इ) वरील जाहिरात अधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बदल सुचवाल?

नमुना क्र. २

- **खाली दिलेल्या शब्दांवरून आकर्षक जाहिरात तयार करा.**

शब्द- छत्री, रेनकोट, पाऊस

**लक्षात घ्या.**

✻ कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय समजणे अपेक्षित.
✻ शब्दरचना व वाक्यरचना समजण्यास सोपी असणे आवश्यक.
✻ आलंकारिक व काव्यमय शब्दांचा वापर- जाहिरात आकर्षक होण्यास मदत.
✻ काळानुरूप जाहिरातीतील भाषा वापरणे आवश्यक.

**दिलेल्या रिकाम्या जागी जाहिरातीचा आकर्षक नमुना तयार करून लिहा.**

# ५. मुलाखत

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवनकार्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे मुलाखत होय.

स्वत: कमीत कमी बोलून समोरच्या व्यक्तीला बोलते करण्याची कला मुलाखतकाराने संपादन करावी लागते.

**मुलाखतकाराने लक्षात ठेवावे**
- पूर्वज्ञान
- मुलाखतीचा हेतू
- व्यक्तीविषयी माहिती

**मुलाखतकाराने घ्यावयाची काळजी**
- वातावरणात कृत्रिमता नसावी.
- शब्दांत जवळीक
- कमी बोलणे
- सहज संवाद
- योग्य आदर

**मुलाखतीचे दोन भाग**
- प्रत्यक्ष मुलाखत घेणे
- शब्दबद्ध करणे

## मुलाखतीची वैशिष्ट्ये

| मुलाखत घेताना | मुलाखत लिहिताना |
|---|---|
| (१) प्रश्नोत्तर स्वरूपात संवाद. | (१) सुरुवातीस प्रास्ताविक/परिच्छेद. |
| (२) मोकळे वातावरण. | (२) नेमके प्रश्न-उत्तर सविस्तर. |
| (३) समोरच्या व्यक्तीचा मान राखत संवाद. | (३) मूळ आशयाला धक्का न लावता आकर्षक संपादन. |
| (४) व्यक्तीला बोलते करणे. | |

मुलाखत घेणे, मुलाखत देणे, मुलाखत वाचणे व मुलाखत ऐकणे या आनंददायी प्रक्रिया आहेत.

बालमित्र चित्रकला स्पर्धेत तुमच्या शाळेतील चि. अमित/कु. अमिता घोलप यास/हीस राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यासंदर्भात त्याची/तिची मुलाखत घ्या.

# मुलाखत लेखन नमुना

विद्यार्थी मित्रांनो,

खालील मुलाखत ही काल्पनिक असली, तरी त्यातील विषय व त्याचे गांभीर्य महत्त्वाचे आहे. व्यसनाधीनता हा सुदृढ व निकोप जीवनाला लागलेला शाप असतो. त्यापासून जाणीवपूर्णक अन् निर्धाराने दूर असलेल्या व्यक्तींनाच सुखी व निरामय जीवनाचा सूर गवसतो. हा आनंदी जीवनाचा मंत्र जाणून घ्या व कोणत्याही लोभाला कधीच बळी पडू नका. स्वत:चे व पर्यायाने समाजाचे निकोप मनच राष्ट्रप्रगतीसाठी आवश्यक असते.

नमस्कार! आज व्यसनमुक्ती दिन. त्या निमित्ताने सोनेगाव या गावात व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करणारे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शैलेश वाघ यांची अक्षय चौधरी यांनी घेतलेली ही मुलाखत वाचा. त्यांच्या 'मुक्तानंद' व्यसनमुक्ती केंद्राबाबत अधिक जाणून घेऊया.

प्रश्न : सर नमस्कार, 'मुक्तानंद' हे केंद्र स्थापन करण्याची गरज का भासली?

उत्तर : अनेक पालक नेहमीच माझ्याकडे व्यसनमुक्तीबाबत सल्ला घेण्यास व मुलांवर उपचार करण्यास येत. त्यांची गरज व इच्छा ओळखून मी हे केंद्र स्थापन केले.

प्रश्न : डॉक्टर, ही किशोरवयीन मुले व्यसनाधीनतेकडे का वळली असतील, असे तुम्हांला वाटते?

उत्तर : छान प्रश्न विचारला. व्यसनाधीन होण्याची कारणे बरीच आहेत. काही मुले अबोल, आत्मविश्वासाची कमतरता, शैक्षणिक अपयश, कौटुंबिक ताणतणाव, प्रेमभंग यांमुळे मानसिक नैराश्याच्या भावनेला बळी पडून त्यातून बाहेर पडण्यासाठी मित्रपरिवाराचा आधार घेतात. त्यात संधी मिळाल्यास ती व्यसनांकडे आकर्षित होतात.

प्रश्न : मुले एकदम व्यसनाधीन बनतात की सुरुवातीला दुसरे काही सेवन करतात?

उत्तर : खरं तर, सुरुवातीला गंमत व नंतर सवय म्हणून व्यसन केले जाते. या गोष्टी 'स्लो पॉइझनिंग' आहेत हे त्यांना कळत नाही.

प्रश्न : डॉक्टर, या मुलांमध्ये काही वेगळी अशी लक्षणे आढळतात का?

उत्तर : त्यांना झोप येत नाही, त्यांचे हात-पाय थरथरतात, त्यांना भीती वाटते, कायम अस्वस्थता जाणवत असते; पण ते स्वत:हून कबूल करत नाहीत. दीर्घ संवादानंतरच ती व्यसनाधीनता लक्षात येते.

प्रश्न : व्यसनाधीनतेचे वैयक्तिक आणि सामाजिक दुष्परिणाम होतात का?

उत्तर : किशोरवयीन मुलांमधील व्यसनाधीनता त्यांच्यासाठी व समाजासाठीही घातक असते.

प्रश्न : डॉक्टर, या परिस्थितीत आपण कोणता सल्ला द्याल?

उत्तर : पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधावा. विचार, मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे. घरातील वातावरण सुसंवादी व मैत्रीपूर्ण असावे. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची सर्वांनीच जाण ठेवावी.

# ६. संवाद लेखन

संवाद लेखन या घटकाचे प्रमुख उद्‌दिष्ट विद्यार्थ्यांना सुसंवादी बनवणे. ‘संवाद कौशल्य’ हा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा अपरिहार्य पैलू आहे. उत्कृष्ट संवाद साधणारी व्यक्ती त्यांच्या कार्यक्षेत्रात स्वत:चे वेगळेपण सिद्ध करते. विशिष्ट विषयावर व्यक्त केलेली मतमतांतरे, त्या विषयावरचे चिंतन व विषयानुरूप सुसंगत असे संभाषण म्हणजे संवाद होय.

**संवाद**

**हे असावे**

(१) संवाद कोणाकोणात सुरू आहे, याची स्पष्ट कल्पना लेखनातून यावी.
(२) संवादांतील दोन व्यक्ती भिन्न स्तरावरील (वय, व्यवसाय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी) असतील तर त्यानुसार भाषा बदलती असावी.
(३) संवादातील वाक्ये सोपी, सुटसुटीत, अनौपचारिक असावीत.
(४) संवादाला योग्य समारोप असावा.
(५) संवाद वाचल्यावर त्या विषयावरचा सर्वांगीण विचार वाचकापर्यंत पोहोचावा.

**हे नसावे**

(१) हो–नाही स्वरूपाचे संवाद नसावेत.
(२) बोलणे पाल्हाळीक नसावे.
(३) मध्येच बोलणे थांबवल्याची भावना नसावी.
(४) संवाद ओढून–ताणून केलेला नसावा.
(५) संवाद मुद्दे सोडून भरकटणारा नसावा.

**संवादासाठी आवश्यक स्वभाव वैशिष्ट्ये**

(१) संवेदनशीलता
(२) गुणग्राहकता
(३) अनाग्रही वृत्ती
(४) विवेकशीलता
(५) भावनिकता
(६) विश्वासार्हता
(७) स्वागतशील रसिक वृत्ती

ही वैशिष्ट्ये अंगी असतील तरच माणूस सुसंवादी बनतो.

## संवाद लेखन नमुना

### संगणकाचा महिमा

| आजोबा | नात |
|---|---|
| (रघुनाथराव) | (शिवानी) |

**आजोबा** : बरेच दिवस झाले चेन्नईला येऊन! मला मुंबईला गेलं पाहिजे.

**शिवानी** : आजोबा 'तुम्ही खूप दिवस राहणार आहे', असं म्हणाला होतात.

**आजोबा** : अग दिवसभर मी एकटा असतो घरात. इथे मराठी वर्तमानपत्रसुद्‌धा मिळत नाही. मी वेळ कसा घालवणार?

**शिवानी** : एवढंच ना आजोबा! तुम्हांला रोज मराठी वर्तमानपत्र वाचायला मिळेल, मी व्यवस्था करते.

**आजोबा** : ते कसं काय शक्य आहे बुवा?

**शिवानी** : आजोबा, हे संगणकाचे युग आहे. नेटवरून काही सेकंदातच जगातील कोणतीही गोष्ट आपण घरबसल्या उपलब्ध करून घेऊ शकतो. आता जगात अशक्य असं काहीच राहिलं नाही.

**आजोबा** : पोरी, हे सगळं मी ऐकलंय खरं....

**शिवानी** : आजोबा, मी नेट सुरू केलंय. कोणतं वर्तमानपत्र वाचायचंय तुम्हांला?

**आजोबा** : 'सर्वकाळ'.

**शिवानी** : थांबा हं, मी आता ही अक्षरे संगणकावर टाईप करते.

**आजोबा** : अरे व्वा! सगळी पाने दिसायला लागली की इथे... सगळ्या बातम्या वाचतो आता!

**शिवानी** : आजोबा, तुम्ही आता तुमच्या मित्रांना ई-मेल पण करू शकता.

**आजोबा** : खरंच पोरी, या संगणकाने संपूर्ण जगालाच एकदम जवळ आणलंय!

# ७. वृत्तान्त लेखन

वृत्तान्त लेखन

↓

**घडलेल्या घटनेचे नेमके वर्णन**

* वृत्तान्त लेखनात राग, आनंद, दु:ख, आश्चर्य इत्यादी तीव्र भावना व्यक्त करणे अपेक्षित नाही.

कल्पनेला अजिबात वाव नाही — **लक्षात ठेवा** — सत्यकथन व वस्तुनिष्ठता यांस महत्त्व

*** सभा, संमेलने, शिबिरे, कार्यशाळा यांच्याविषयीच्या एखाद्या घटनेसंबंधी सविस्तर व क्रमवार माहिती सांगणे म्हणजे वृत्तान्त लेखन होय.**

**वृत्तान्त लेखन**

- आटोपशीर व आकर्षक पद्धतीने लेखन आवश्यक
- तारीख, वेळ, ठिकाण देणे आवश्यक

**लक्ष द्या.**

**वृत्तान्त**

- मथळा
- स्पष्टीकरण
- घटनांचा क्रम
- लहान वाक्ये व लहान परिच्छेद
- नकारात्मक भाषा नको
- भाषा वास्तवदर्शी असावी
- स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अचूक उल्लेख
- घटनेचे अचूक, परिपूर्ण, स्पष्ट लेखन

## वृत्तान्त लेखन नमुना

### ❁ मराठी भाषा दिन उत्साहात साजरा ❁

**रत्नागिरी, ता. २८ फेब्रुवारी :** रत्नागिरी येथील समर्थ विद्यामंदिर येथे मराठी भाषा दिन दिनांक २७ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मराठी विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक श्री. म. सा. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सकाळी ठीक ७.३० वाजता इयत्ता पाचवी ते इयत्ता सातवीमधील विद्यार्थ्यांनी गावातून ग्रंथदिंडी काढली. सकाळी ९.०० वाजता शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक शाळेच्या सभागृहात एकत्र जमले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व मा. मुख्याध्यापक स्थानापन्न झाले.

सरस्वतीच्या प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कविता वाचन, मराठी गीतगायन, कथाकथन, कादंबरीतील काही अंशांचे अभिवाचन इत्यादी प्रकारचे सुंदर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले.

'कविवर्य कुसुमाग्रजांचे मराठी भाषेतील योगदान व मराठी भाषेचे महत्त्व' या विषयावर प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी प्रतिनिधी सुशांत कांबळे याने उपस्थितांचे आभार मानले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **खालील विषयावर वृत्तान्त लेखन करा.**

**नवमहाराष्ट्र विद्यालय**

विमाननगर, वसई

**जागतिक विज्ञानदिन सोहळा**

जागतिक विज्ञानदिनानिमित्त सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ

डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान

प्रमुख उपस्थिती– .........

२८ फेब्रुवारी

**वेळ**

सकाळी ११ वाजता

**स्थळ–**

डॉ. होमीभाभा सभागृह

# ८. लेखनकौशल्य

## निबंध लेखन

या इयत्तेत आपण विविध लेखनकौशल्यांच्या प्रकारांचा अभ्यास करणार आहोत. निबंधलेखन म्हणजे विषयानुरूप केलेली विचारांची मुद्द‌ेसूद मांडणी होय. एखाद्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, स्वानुभव यांना प्रभावी भाषेत मुद्द‌ेसूदपणे मांडणे म्हणजे निबंधलेखन. निबंधलेखनात लिहिणाऱ्याच्या विचारांचे प्रतिबिंब पडत असते. लेखनकौशल्याचा विकास व अभिव्यक्तीक्षमतेचा विकास हे निबंधलेखन घटकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**निबंधलेखनासाठी आवश्यक गोष्टी.**

- निरीक्षण
- वाचन
- बहुश्रुतता
- शब्दसंपत्ती
- चिकित्सक विचार
- कल्पना
- भावना
- अनुभव
- चिंतन
- प्रभावी भाषा
- विषयानुरूप शैली

पाठ्यपुस्तकातील निबंधलेखन-लेखनकौशल्यांतर्गत आपण इयत्ता नववीसाठी प्रसंगलेखन, आत्मकथन, कल्पना विस्तार या निबंधप्रकारांचा अभ्यास करूया.

कल्पकता, तर्कसंगती, विचाराची सुसंगत व सुसंबद्‌ध मांडणी ही लेखनकलेची काही वैशिष्ट्ये आहेत. आपण निबंध लिहितो म्हणजे विषयाच्या अनुषंगाने असलेले आपले वाचन, चिंतन, निरीक्षण, विचार व भावना यांना शब्दबद्‌ध करतो. आपले अनुभव मुद्द‌ेसूदपणे मांडतो. त्यासाठी प्रत्येक अनुभवाकडे संवेदनशीलतेने पाहता यायला हवे. आपल्या शब्दांतील अनुभव इतरांच्या मनाला भिडेल असा मांडता यायला हवा. शब्दांतून भाषासौंदर्य व्यक्त व्हायला हवे.

वाचन, आकलन, निरीक्षण, विचार, भावना, कल्पना व अनुभव यांची प्रभावी शब्दांत अभिव्यक्ती हा लेखनकौशल्य विकासाचा गाभा आहे.

निबंधलेखनासाठी आवश्यक क्षमता, कौशल्ये, अभ्यास घटक हे सर्वच निबंधप्रकाराबाबत समान असले तरी प्रत्येक निबंध प्रकाराचे स्वत:चे वेगळेपण असते. निबंध प्रकार हाताळताना ती वैशिष्ट्ये लक्षात घेणे, ती अभ्यासणे, सुयोग्य उपयोग करणे आवश्यक ठरते.

### (१) प्रसंगलेखन–

आपण अनुभवलेली, ऐकलेली, एखादी घटना, एखादा प्रसंग, एखादा विचार, एखादी समस्या आपल्याला नेहमीच विचार करायला प्रवृत्त करीत असते. तो प्रसंग जर आपल्या बाबतीत घडला तर आपली प्रतिक्रिया काय असेल? असा विचार केल्यास आपण प्रसंगाचे विश्लेषण तटस्थपणे करू शकतो. अशा विचारांना, भावनांना, संवेदनशीलतेची, भावनिकतेची जोड देऊन शब्दबद्ध केले, तर तो प्रसंग वाचणाऱ्याच्या मनाला भिडतो त्या प्रसंगाचे शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे राहू शकते. आपल्या भावना प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्यही व्यक्त होऊन लेखनकौशल्याचा, अभिव्यक्ती क्षमतेचा विकास साध्य होऊ शकतो.

**प्रसंगलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :**

(१) प्रसंगाची, घटनेची कल्पना

(२) सूक्ष्म निरीक्षण

(३) भावनांची अभिव्यक्ती

(४) चित्रदर्शी संवेदनशील लेखन

## प्रसंगलेखन नमुना

• **खालील बातमी वाचा.**




वरील सोहळ्याला तुम्ही उपस्थित होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

## (२) आत्मकथन–

**आत्मलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार.
(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोगिता, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.
(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे.
(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रितीने कल्पना मांडणे.
(५) संपूर्ण लेखन करताना भाषा प्रथमपुरुषी एकवचनी असावी.

### आत्मकथन नमुना

**वर्गातील बाक तुमच्याशी बोलतोय अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहा.**




## (३) कल्पना विस्तार

### कल्पना विस्तार करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे

(१) कल्पनाप्रधान लेखनकौशल्याचा उद्देशच कल्पना करता येणे हा आहे.
(२) मुख्य कल्पना निबंधाच्या शीर्षकातच दडलेली असते.
(३) एकातून दुसरी कल्पना अशी कल्पनांची साखळी लेखनकौशल्य वाढवते.
(४) कल्पना वास्तवाला धरून किंवा गमतीदार असावी.
(५) विषयासंबंधी सुचलेल्या कल्पनांचा विस्तार करावा.

**मी पक्षी झाले तर.....**

चौकटीतील मुद्द्यांच्या आधारे कल्पना करून आत्मकथनपर लेखन करा.



• **खालील उतारा वाचा. त्याचे निरीक्षण करा. एकाच उताऱ्यात म्हणी, वाक्प्रचार, आलंकारिक भाषा, नावीन्यपूर्ण शब्दसमूह यांचा सुयोग्य व चपखल उपयोग आढळतो. यातूनच मराठी भाषेची भाषिक समृद्धी अधोरेखित होते.**

बंडू म्हणजे अतिशय धडपड्या व खळाळत्या उत्साहाचा झरा. तो त्याच्या धाकट्या बहिणीला म्हणाला, ''ताई तुम्ही या खुर्चीवर स्थानापन्न व्हा. मी आपल्या हातांवर न भूतो न भविष्यति अशी सुरेख मेंदी रेखाटतो.'' मेंदी म्हणजे तायडीचा जीव की प्राण. ती खुर्चीवर बसताच टेबलावरच कोन घेऊन तो तिच्याजवळ बसला. त्याने जशी तिच्या हातावर मेंदी रेखाटायला सुरुवात केली, तसे त्याला जाणवले, की मेंदी रेखाटने आपल्या आवाक्याबाहेरचे आहे; पण हे कबूल करणे त्याच्या जिवावर आले. यातून पळवाट काढण्यासाठी तो तायडीला म्हणाला, ''अगं, नीट बस.'' तुझ्या हातावर मेंदी काढताना माझी किती त्रेधातिरपीट उडते आहे. त्याचे हे वाक्य ऐकून घरात खसखस पिकली. आजी हळूच म्हणाली, ''नाचता येईना, अंगण वाकडे'', तर स्वयंपाक आटोपून आजी शेजारी आई बसली आणि गालातल्या गालात हसत म्हणाली, 'उथळ पाण्याला खळखळाट फार.' हे ऐकून बंडूच्या नाकाला मिरच्या झोंबल्या; पण करणार काय? त्याची अवस्था इकडे आड तिकडे विहीर अशी झाली होती. आजी आईकडे पाहत डोळे मिचकावत म्हणाली, ''अगं आपला बंडू आहेच, झाकले माणिक आणि वाकबगार. सगळ्या कलाकौशल्यांत आपला हातखंडा असावा, असंच त्याला वाटतं.'' तेवढ्यात हातातला पेपर बाजूला सारत त्याचे बाबा म्हणाले, ''बंडूराजे, तायडीच्या हातावर उजेड पाडून तारे तोडून झाले असतील, तर पानावर बसूया का? पोटात कावळे ओरडायला लागलेत आमच्या. आधी पोटपूजा करूया, मग वाटल्यास तुम्ही मेंदीच्या मोहिमेवर कूच करा आणि मोहिमेची इतिश्री करा.''

• **खाली दिलेल्या रिकाम्या चौकटीत शब्दसमूह, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर करून उतारा तयार करा.**

## 'बोलीभाषेतील सांस्कृतिक ठेवा'

महाराष्ट्रातील सर्वच बोलीभाषांचा भाषिक, सांस्कृतिक ठेवा समृद्ध आहे त्याचबरोबर आनंददायीही आहे. या विविध बोलीतील काही प्रातिनिधिक उदाहरणे वाचा व त्याचा आनंद घ्या. त्याचबरोबर इतर बोलीभाषांमधील भाषिक समृद्धीचा शोध घ्या.

- **पावरी बोली– (कोडे)**

(१) जंगलमा रमणेवाली रातला पाणी पिणारी बुड इंडा मेकणे–वाली ची कुण?

–जंगलात राहणारी, लाल पाणी पिणारी, पांढरी अंडी देणारी, ती कोण? [ ]

(२) एक दाद ने पेटम दाने

– एका दादाच्या पोटात अनेक दात– [ ]

**म्हणी**

(१) कागला काल भुईला भार–

खायला काळ अन् भुईला भार.

(२) रूपड्या ताकली गुपज्या माकली–

लेकी बोले सुने लागे.

(३) करनू नी तीना डरनू ती–

कर नाही त्याला डर काय?

(४) खिसाम काय आदलू नी अत्ती गुलवतलू–

खिशात दमडीं नाही अन् चालला हत्ती घ्यायला.

- **वऱ्हाडी बोली– म्हणी**

(१) चुली सांगे मुलीले, दोन्ही पाय चुलीले–

दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान, स्वत: कोरडे पाषाण

(२)काखेत घेतलं टिचुकलं सारं गवत इचकलं–

काखेत कळसा अन् गावाला वळसा

- **झाडी बोली– म्हणी**

(१) मा तसि लेक्/मसेला येक्–

एका माळेचे मणी

(२) होता जोन्द्रा पानावऱ्ता दिस्ते–

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.

## • हे शब्द असेच लिहा.

विद्यार्थ्यांनो, प्रत्येक शब्दाला स्वत:चा अर्थ असतो. वर्णाचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द. ही शब्दांची व्याख्या हेच दर्शवते. त्याचप्रमाणे शब्दाला संदर्भानुसारही अर्थ प्राप्त होतो.

उदा., (१) आज माझ्या आजीची पाठ खूप दुखत होती.

(२) आज मी 'वंद्य वन्दे मातरम्' कविता पाठ केली.

पाठ या एकाच शब्दाचे दोन्ही वाक्यांतील अर्थ भिन्न आहेत. याचप्रमाणे 'शब्द' जर चुकीचा लिहिला गेला तरी त्याचा अर्थ बदलू शकतो. अगदी वेगळ्याच अर्थाचा शब्द तयार होऊ शकतो.

उदा., (१) **कृतज्ञ**– उपकाराची जाण असलेला

**कृतघ्न**– उपकाराची जाण न ठेवणारा

(२) **पाणी**– पिण्याचे पाणी/जल

**पाणि**– हात

पाणी शब्द पाणि असा लिहिल्याने केवळ ऱ्हस्व (ईकार), दीर्घ (ईकार) लिहिल्याने शब्दाचा अर्थच बदलला.

यावरून लक्षात येते, की आपले म्हणणे अपेक्षित योग्य अर्थवाही होण्यासाठी शब्दांचे सुयोग्य म्हणजेच लेखननियमांनुसार लेखन होणे आवश्यक असते.

खाली काही असे शब्द दिलेले आहेत, की जे नेहमी तुमच्या वाचनात, लेखनात येतात; परंतु ते चुकण्याची शक्यताही असते. या शब्दांचा अभ्यास करा. त्यांचे उच्चारानुसार लेखन (योग्य लेखन नियमांनुसार) समजून घ्या. त्यांचा सराव करा व त्यांचे योग्य उपयोजन करा.

| | | | |
|---|---|---|---|
| अंत:करण | गरिबी | प्रीती | व्यक्तिमत्त्व |
| अनिर्णित | चमत्कृती | सत्कृत्य | गरीब |
| अर्थशास्त्रज्ञ | जीवितकार्य | महत्त्व | सामूहिक |
| अस्तित्व | ठरावीक | मूर्तिपूजा | सार्वजनिक |
| आशीर्वाद | तत्त्वज्ञान | मैत्रीण | सार्वत्रिक |
| उज्ज्वल | दातृत्व | मैत्रिणीला | साहित्यिक |
| उन्मेष | दीपप्रज्वलन | वक्तृत्व | सूचना |
| ओजस्वी | दृष्टिकोन | वाङ्मय | स्फूर्ती |
| औचित्य | निर्मिती | विषण्ण | सृजनशीलता |
| ऋणनिर्देश | निर्भर्त्सना | वैफल्य | स्मृतिदिन |
| कर्तृत्व | निष्क्रिय | वैशिष्ट्य | स्मृती |
| कीर्ती | परिस्थिती | हळूहळू | हार्दिक |
| कुत्सित | परीक्षा | क्रीडांगण | हृदय |

## • पारिभाषिक शब्द

ज्ञानप्रसाराच्या विविध माध्यमांत आणि जीवन व्यवहारात सतत बदल होत असतात. साहजिकच त्या त्या ज्ञानक्षेत्रात वा व्यवहारात प्रचलित शब्दांहून वेगळे शब्द वापरले जातात. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील माहिती, संकल्पना यांच्या प्रकटीकरणाला योग्य ठरतील असे शब्द वापरण्याची गरज असते. भाषिक व्यवहाराच्या या वेगळेपणातून ज्ञानक्षेत्रांची वा व्यवहारांची परिभाषा सिद्ध होते. अशा परिभाषेतून शास्त्रभाषेचा व ज्ञानभाषेचा विकास होत असतो. बदलते जीवनव्यवहार, वाढत्या गरजा आणि विस्तारणारी ज्ञानक्षेत्रे यांनुसार 'पारिभाषिक संज्ञा' निर्माण होतात.

पारिभाषिक पदनामांच्या वापरामुळे किंवा पारिभाषिक संज्ञांच्या वापरामुळे विचार, संकल्पना यांच्या प्रकटीकरणात विशिष्टता, निर्दोषता येते. पारिभाषिक संज्ञांचा मूळ उद्‌देश व्यवहारसापेक्ष भाषेचे उपयोजन हा आहे.

शिक्षण, विविध शास्त्रे, प्रशासन, आरोग्य, समाज, उद्‌योग, व्यापार, न्याय, आर्थिक व्यवहार, कला, संस्कृती इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आवश्यकतेनुसार पारिभाषिक संज्ञा उपयोगात आणल्या जातात. या संज्ञांमुळे ज्ञानव्यवहार अधिक प्रभावी आणि सुस्पष्ट होतात. या दृष्टीने पारिभाषिक संज्ञांना अनन्यसाधारण महत्त्व असते.

| | | | |
|---|---|---|---|
| Calligraphy | सुलेखन | Secretary | सचिव, चिटणीस |
| Academic Qualification | शैक्षणिक अर्हता | Children's Theatre | बालरंगभूमी |
| Action | कार्यवाही/कृती | Comedy | सुखात्मिका |
| Census | जनगणना | Agent | अभिकर्ता/प्रतिनिधी |
| Casual Leave | नैमित्तिक रजा | Category | प्रवर्ग |
| Anniversary | वर्धापनदिन | Bio-data | स्व-परिचय |
| Corporation | महामंडळ, निगम | Bonafide Certificate | वास्तविकता प्रमाणपत्र |
| Daily Wages | दैनिक वेतन, रोजंदारी | Book Stall | पुस्तकविक्री केंद्र |
| Lyric | भावगीत | Dismiss | बडतर्फ |
| Magazine | मासिक-पत्रिका | Event | घटना |
| Medical Examination | वैद्यकीय तपासणी | Exchange | देवाण-घेवाण, विनिमय करणे |
| Express Highway | द्रुतगती महामार्ग | | |
| News Agency | वृत्तसंस्था | Official Record | कार्यालयीन अभिलेख |
| Exhibition | प्रदर्शन | Orientation | निदेशन, उद्‌बोधन |
| General Meeting | सर्वसाधारण सभा | Part Time | अंशकालीन, अर्धवेळ |
| Government Letter | शासकीय पत्र | Goodwill | सदिच्छा |
| Programme | कार्यक्रम | Handbill | हस्तपत्रक |
| Plumber | नळ-कारागीर | Honorable | माननीय |
| Pocket Money | हातखर्च | Humanism | मानवतावाद |
| Index | अनुक्रमणिका | Registered Letter | नोंदणीकृत पत्र |
| Junior Clerk | कनिष्ठ लिपिक | Receptionist | स्वागतिका |
| Refreshment | अल्पोपहार | Journalism | वृत्तपत्रकारिता |

# पूरक पुस्तके व संदर्भग्रंथ यांची यादी

## पूरक पुस्तकांची यादी

(१) हाती ज्यांच्या शून्य होते- संपादन अरुण शेवते.

(२) मुसाफिर- अच्युत गोडबोले

(३) एक होता कार्व्हर- वीणा गवाणकर

(४) मन में है विश्वास- विश्वास नांगरे पाटील

(५) आय डेअर- किरण बेदी

(६) आकाशाशी जडले नाते- जयंत नारळीकर

(७) समिधा- साधनाताई आमटे

(८) खरेखुरे आयडॉल- सुधा मूर्ती

(९) संस्कृतीच्या पाऊलखुणा- द. ता. भोसले

(१०) व्यक्ती आणि वल्ली- पु. ल. देशपांडे

(११) झाडाझडती- विश्वास पाटील

(१२) स्वामी- रणजित देसाई

(१३) यश तुमच्या हातात- शिव खेरा

(१४) तोत्तोचान- चेतना सरदेशमुख (अनुवादक)

(१५) आई समजून घेताना- उत्तम कांबळे

(१६) पक्ष्यांचे ठसे- सुधीर मोघे (कविता संग्रह)

## संदर्भ ग्रंथांची यादी


(१) वाचू आनंदे- भाग १ ते ४ – माधुरी पुरंदरे

(२) लिहावे नेटके- भाग १ व २ – माधुरी पुरंदरे

(३) सुगम मराठी व्याकरण व लेखन – मो. रा. वाळंबे



## महत्वाची संकेतस्थळे व लिंक्सची यादी

https://youtu.be/NJmOlUnFK54

https://en.wikipedia.org/.../Gajanan_Digambar_Mad..

https://youtu.be/Pz2_lLpyFgY

https://en.wikipedia.org/wiki/Marathi_Vishwakosh

https://en.wikipedia.org/wiki/Charlie_Chaplin

https://en.wikipedia.org/wiki/M._Visvesvaraya

https://en.wikipedia.org/wiki/Olympic_Games

https://youtu.be/EJ9ELMcbn1w

https://www.youtube.com/watch?v=Rm4PS8O8c-A

https://www.youtube.com/watch?v=AhyCHlFF_9Q

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित अधिक माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

---

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी कुमारभारती इयत्ता ९ वी (मराठी माध्यम)

₹ ६५.००